CANTRONICS OFFICE EQUIPMENT PRIVATE LIMITED
CIN: U32109MH1994PTC084138
Liquidator: Bharati Manoj Daga
(Reg No. IBBI/IPA-01/IP-P01963/20-21/13070)

Notice is hereby given to the public in general CANTRONICS OFFICE EQUIPMENT PRIVATE LIMITED (In Liquidation) ("Corporate Debtor") is proposed to be sold as Going Concern in accordance with the clause € of regulation 32A sub-regulation (1) of regulation 33 and Schedule I of the Insolvency And Bankruptcy Board Of India (Liquidation Process)Regulation, 2016through e-auction Platform. The interested applicants may refer to the detailed e-auction process memorandum available on emailing at liquidcantronics@gmail.com.

| | |
|---|---|
| **Date of Auction** | **26th September 2023** |
| **Last Date of submission of Bid Documents** | **3rd October 2023** |
| **Last Date of submission of Earnest Money** | **3rd October 2023** |

| Particulars of Asset | RESERVE PRICE (AMOUNT IN Rs.) | EARNEST MONEY (AMOUNT IN Rs.) |
|---|---|---|
| Sale of Corporate Debtor as going concern along with the assets and Liabilities | 31,12,701 | 3,11,270 |

Terms and Condition of the E-auction are as under

1. E-Auction will be conducted on "AS IS WHERE IS", "AS IS WHAT IS" and "WHATEVER THERE IS BASIS" through approved service provider.
2. The Complete E-Auction process document containing details of the Assets, online e- auction Bid Form, Declaration and Undertaking Form, General Terms and Conditions of online auction sale are available on website https://nclt.auctiontiger.net. For more details **E-mail :** liquidcantronics@gmail.com

Bharati Manoj Daga Mumbai IP 13070

BDaga

Bharati Manoj Daga
Liquidator: CANTRONICS OFFICE EQUIPMENT PRIVATE LIMITED
(Reg No. IBBI/IPA-01/IP-P01963/20-21/13070)
Address: 94B Palash Tower Veera Desai rd, Andheri (w), Mumbai 400053.
Email: liquidcantronics@gmail.com

# जम्मू काश्मीरमध्ये एनआयएची दहशतवादविरोधी कारवाई

■ श्रीनगर

**राष्ट्रीय** तपास संस्थेने (एनआयए) आज दहशतवाद संबंधित एका प्रकरणात काश्मीर खोऱ्यातील अनंतनाग, शोपियान आणि पुलवामा या तीन



जिल्ह्यांतील पाच ठिकाणी छापे टाकले. या छापेमारीत एनआयएच्या अधिकाऱ्यांनी आक्षेपार्ह डेटा असलेली अनेक डिजिटल उपकरणे जप्त केली. एनआयएने छापे टाकलेल्या नवीन दहशतवादी संघटनांमध्ये द रेझिस्टन्स फ्रंट, युनायटेड लिबरेशन फ्रंट जम्मू अँड काश्मीर, मुजाहिदीन गझवत-उल-हिंद, जम्मू आणि काश्मीर फ्रीडम फायटर, काश्मीर टायगर यांचा समावेश आहे.

आज दक्षिण काश्मीरमधील तीन जिल्ह्यांमध्ये नव्याने स्थापन केलेल्या काश्मिरी दहशतवादी संघटनांच्या सहयोगींच्या घरांवर छापे टाकण्यात आले. जम्मू-काश्मीरमधील दहशतवाद, हिंसाचार आणि तोडफोडीशी संबंधित कारवायांची चौकशी केली जाणार आहे. दरम्यान, एनआयएने २१ जून २०२२ रोजी जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी कटाच्या या प्रकरणात एफआयआर नोंदवला होता. एनआयएच्या म्हणण्यानुसार, जम्मू-काश्मीरमधील शांतता आणि जातीय सलोखा बिघडवण्यासाठी स्थानिक तरुणांना दहशतवादी बनवण्याचे पाकिस्तान समर्थित संघटनांचे प्रयत्न हे सध्या सुरक्षा यंत्रणांसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. या षडयंत्रामागील पाकिस्तान स्थित गुंड लोकांमध्ये दहशत पसरवण्यासाठी अनेक सोशल मीडियाचा वापर करत होते. काश्मीरमधील त्यांच्या एजंट आणि कॅडरला शस्त्रे, दारूगोळा, स्फोटक शस्त्रे, अंमली पदार्थ पोहोचवण्यासाठी ते ड्रोनचा वापर करत होते.

# दिल्लीत ज्वेलर्सचे दुकान फोडून २५ कोटींची चोरी

■ नवी दिल्ली

**दिल्लीतील** जंगपुरा येथील ज्वेलर्समध्ये कोट्यवधींची चोरी झाली. उमराव सिंह या दुकानातून सोमवारी चोरांनी सर्वच्या सर्व दागिने चोरून नेले. रविवारी रात्री दुकान बंद करून मालक घरी गेले. सोमवारी दुकान बंद होते. आज सकाळी दुकान उघडल्यावर दागिने लंपास झाले होते. दुकानात ठेवलेले २० ते २५ कोटी रुपयांचे हिरे आणि सोन्याचे दागिने चोरट्यांनी पळवून नेल्याचे शोरूम मालकांचे म्हणणे आहे.

चोरट्यांनी दुकानाचे छत आणि भिंत फोडून आत प्रवेश केला. दुकानाच्या शेजारीच पायऱ्या आहेत. जिथून चोरट्यांनी दुकानात प्रवेश करण्यासाठी छत फोडले. छत फोडले तो व्हिडीओ समोर आला आहे. त्यात चोरट्यांनी दुकानातील छोटी जागा कापून दुकानात प्रवेश केला. मात्र, या घटनेचे कोणतेही सीसीटीव्ही फुटेज अद्याप समोर आलेले नाही. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस सध्या शोरूममध्ये लावलेले सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत. परिसरातील दुकानांमध्येही चौकशी करण्यात आली.


देश विदेश

# कोरोनासारखा आणखी एक व्हायरस येणार?

■ बीजिंग

**कोरोना** व्हायरससारख्या आजारातून बाहेर पडल्यानंतर अनेकांनी सुटकेचा निःश्वास सोडलेला होता. या आजारामुळे जगभरातील आर्थिक स्थिती कोलमडली होती. आता या आजारानंतर कोरोना व्हायरससारखा आणखी एक आजार भविष्यात येऊ शकतो असा इशारा शी झेंगली या शास्त्रज्ञांनी दिला आहे. झेंगली हे प्रसिद्ध विषाणूतज्ज्ञ आहेत. त्यांनी त्यांच्या एका शोधनिबंधात भविष्यात आणखी एक कोरोना व्हायरसचा उद्रेक येण्याची दाट शक्यता वर्तवली आहे.


वुहान इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या झेंगली आणि त्यांच्या टीमने, ४० कोरोनाव्हायरस प्रजातींच्या मानवी समुहाचे परीक्षण केल्यानंतर निम्म्या लोकांना अत्यंत धोकादायक म्हणून चिन्हांकित केले. यापैकी सहा आजारांमुळे त्यांच्यावर परिणाम झाल्याचे निदर्शनास आले आहे. साऊथ चायना मॉर्निंग पोस्टने



चीनच्या शास्त्रज्ञांचा इशारा

दिलेल्या वृत्तानुसार, यापैकी तीन कोरोनाव्हायरसमुळे आणि काहींना इतर प्राण्यांच्या प्रजातींपासून संसर्ग झाल्याचे सांगितले जात आहे. झेंगली यांचे संशोधन हे लोकसंख्या, अनुवांशिक विविधता, यजमान प्रजाती आणि झुनोसिसची पार्श्वभूमी यासह विविध विषाणू वैशिष्ट्यांच्या विश्लेषणावर आधारित होते. यावरून प्राण्यांपासून मानवांना उद्भवू शकणाऱ्या आजाराविषयी संशोधन करण्यात आलेले आहे.

# अमेरिकेतील सर्वात मोठे मंदिर लवकरच सर्वांसाठी खुले होणार



■ न्यूयॉर्क

**जगातील** सर्वात मोठे हिंदू मंदिर अमेरिकेत रॅबिन्सव्हिले येथे बांधण्यात आले आहे. हे मंदिर १८३ एकरमध्ये पसरलेले आहे. भारताबाहेर बांधलेल्या जगातील सर्वात मोठे हिंदू मंदिराचे ८ ऑक्टोबर रोजी उद्घाटन होणार आहे. हे मंदिर अमेरिकेतील प्रसिद्ध न्यूयॉर्क शहरापासून जवळपास ९० किलोमीटर दूर आहे. १२ वर्षे या मंदिराच्या उभारणीचे काम सुरू होते. अमेरिकेतील १२ हजार ५०० भारतीयांनी स्वयंसेवक म्हणून श्रमदान केले. अक्षरधाम म्हणून ओळखले जाणारे हे मंदिर प्राचीन हिंदू धर्मग्रंथांनुसार बांधले गेले आहे. १०,००० शिल्पे आणि पुतळे, भारतीय संगीत वाद्ये आणि नृत्य प्रकारांच्या कोरीव कामांसह प्राचीन भारतीय संस्कृतीचे दर्शन घडते. २०११ मध्येच या मंदिराचे बांधकाम सुरू करण्यात आले होते. जवळपास १२ वर्षांनंतर आता या भव्यदिव्य मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

# लखीमपूर खेरी हिंसाचार प्रकरणी आशिष मिश्राला जामीन मंजूर

■ नवी दिल्ली

**लखीमपूर** खेरी हिंसाचार घटनेतील मुख्य आरोपी आशिष मिश्रा याला सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. आशिष मिश्रा याचा जामीन न्यायालयाने मंजूर केला आहे. तसेच त्याला दिल्लीमध्ये राहण्याची परवानगीही देण्यात आली आहे. परंतु जामीन देताना न्यायालयाने काही अटीही घातल्या आहेत. त्यानुसार आशिष मिश्रा कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होऊ शकत नाहीत. तसेच त्यांना प्रसार माध्यमांना संबोधित करण्याची परवानगी देण्यात आलेली नाही. आशिष मिश्रा यांच्या उत्तर प्रदेशातील प्रवेशावरही बंदी कायम असेल. आशिष मिश्राने आजारी आईची काळजी घेण्यासाठी आणि मुलीवर उपचार करण्यासाठी दिल्लीत येण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. आशिष केंद्रीय मंत्री अजय मिश्रा यांचे पुत्र आहेत. २०२१ मध्ये उत्तर प्रदेशातील लखीमपूर खेरी येथे शेतकरी आंदोलन सुरू असताना चार शेतकऱ्यांना चिरडण्याचा आरोप त्याच्यावर आहे.

# मध्य प्रदेशसाठी भाजपची दुसरी उमेदवार यादी जाहीर

■ नवी दिल्ली

**मध्य प्रदेश** विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. या यादीमध्ये ३९ उमेदवारांचा समावेश आहे. भाजपच्या या दुसऱ्या यादीमध्ये तीन केंद्रीय मंत्र्यांचाही समावेश आहे. केंद्रीय मंत्र्यांपैकी नरेंद्र सिंह तोमर, प्रल्हाद सिंह पटेल आणि फग्गन सिंग कुलस्ते यांचा दुसऱ्या यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

केंद्रीय मंत्री नरेंद्र सिंह तोमर हे दिमणी येथून, खासदार राकेश सिंह जबलपूर पूर्व, केंद्रीय मंत्री फग्गन सिंह कुलस्ते निवास मतदारसंघातून तर केंद्रीय मंत्री प्रल्हाद सिंह पटेल नर्सिंगपूर आणि कैलाश विजयवर्गीय हे इंदूर- १ मधून निवडणूक लढतील. पंतप्रधान मोदी यांनी काल भोपाळ येथे भाजप कार्यकर्त्यांना संबोधित केले होते. त्यानंतर काही तासांनतर ही घोषणा करण्यात आली. भाजपच्या राष्ट्रीय सचिवांचाही या यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे. या यादीमध्ये भाजपने आपल्या खासदारांना प्राधान्य दिले आहे. भाजपचे राष्ट्रीय सचिव कैलाश विजयवर्गीय यांना इंदूर-१ मधून संधी दिल्याने त्यांचे पुत्र आकाश यांना तिकीट मिळणार नाही. भाजपचे तीन खासदार उदय प्रताप सिंह, रीती पाठक आणि गणेश सिंह यांचाही दुसऱ्या यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

# इम्रान खान यांचा न्यायालयीन कोठडीतील मुक्काम वाढला

■ इस्लामाबाद



**पाकिस्तानचे** माजी पंतप्रधान इम्रान खान यांचा न्यायालयीन कोठडीतील मुक्काम आणखी १४ दिवसांनी वाढला आहे. पाकिस्तानच्या विशेष न्यायालयाने आज गोपनीय कागदपत्र लीक प्रकरणात इम्रान खान यांच्या न्यायालयीन कोठडीत वाढ केली. आपल्या राजकीय फायद्यासाठी इम्रान खान यांनी चुकीच्या पद्धतीने गोपनीय कागदपत्रे ताब्यात घेतली आणि त्याचा गैरवापर केला. यासाठी इम्रान खान आणि शाह मेहमूद कुरेशी यांना ऑफिशियल सिक्रेट्स ॲक्ट अंतर्गत अटक करण्यात आली होती.

बुधवारी झालेल्या सुनावणीनंतर न्यायालयाने दोन्ही नेत्यांच्या न्यायालयीन कोठडीत २६ सप्टेंबरपर्यंत वाढ करण्याचे आदेश दिले होते. या प्रकरणी इस्लामाबाद उच्च न्यायालयाने यापूर्वीच इम्रान खानच्या शिक्षेला स्थगिती दिली आहे, मात्र असे असतानाही इम्रान खान तुरुंगात आहेत.

# कॅनडात भारतीय दूतावासाबाहेर खलिस्तान समर्थकांची निदर्शने

■ ओटावा

**कॅनडात** काल खलिस्तानी समर्थकांनी भारताविरोधात निदर्शने केली. ज्यामध्ये भारताच्या तिरंग्याचाही अपमान करण्यात आला आहे. शिख फॉर जस्टिस प्रमुख गुरपतवंत सिंग पन्नूने या निदर्शनाची हाक दिली होती. कॅनडात एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या ठिकाणी निदर्शने झाली. पहिले निदर्शन कॅनडातील व्हँकुव्हर येथे झाली. जिथे काही खलिस्तानी समर्थक भारतीय दूतावासाबाहेर जमले आणि त्यांनी निदर्शने सुरू केली. खलिस्तानच्या समर्थनार्थ घोषणाबाजी करण्यात आली. एवढेच नाही तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचाही फोटो लावून अपमान करण्यात आला.

कॅनडाच्या पंतप्रधानांनी भारतावर गंभीर आरोप केले होते. या पार्श्वभूमीवर कॅनडाने भारतीय दुतावासातील वरिष्ठ अधिकाऱ्याला देश सोडण्याचे आदेश दिले होते. तर लगेच प्रत्युत्तर देत भारताने कॅनडा दुतावासातील वरिष्ठ अधिकाऱ्याची हकालपट्टी करत पाच दिवसात देश सोडण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर या वादाला तोंड फुटले. पन्नूच्या वतीने भारतीय दूतावासाबाहेर निदर्शने करण्याचे आवाहन करण्यात आले होते. या निदर्शनाला शेकडो लोक पोहोचतील असा अंदाज होता, पण तसे झाले नाही. या निदर्शनासाठी केवळ ३० लोक उपस्थित होते. त्याचवेळी यातील बहुतांश जण रोजंदारीवर निदर्शनासाठी जमले असल्याची माहिती आहे. भारताच्या कठोर भूमिकेनंतर भारतीय दूतावासाबाहेर जमणाऱ्या खलिस्तानी समर्थकांची गर्दी दिवसेंदिवस कमी होत आहे.

# विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंचा सत्ताधाऱ्यांवर गंभीर आरोप

■ नागपूर

**आपल्या** मर्जीतील गुत्तेदारांच्या फायद्यासाठी नागपूरच्या विकासाचे सोंग घेऊन नागपूरच सिमेंटीकीकरण व पर्यावरणाचा ऱ्हास करून नागपूरकरांना पूरपरिस्थितीत ढकलून देण्याचे पाप हे स्थानिक राजकीय नेतृत्वाने केले, असा गंभीर आरोप विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी नागपूर येथील पत्रकार परिषदेत केला. अंबादास दानवे यांनी आज नागपूर येथे आलेल्या पूरपरिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेऊन पूरग्रस्त नागपूरकरांशी संवाद साधला.

या घटनेला नागपूर महानगरपालिका व नागपूर सुधार प्रन्यास हे ही तितकेच जबाबदार असून यांच्यात समन्वय नसल्याचे दिसून आल्याचे दानवे यांनी म्हणत प्रशासन यंत्रणेच्या कारभारावरही त्यांनी बोट ठेवले.

प्रशासन यंत्रणा घटना घडण्याची वाट बघत होते का अशी स्थिती आहे. महानगरपालिकेने नागरिकांच्या नुकसानीचे पंचनामे केले असले तरी अद्याप नागरिकांपर्यंत मदत पोहचणे आवश्यक आहे. अंबाझरी तलावाची संरक्षक भिंत तुटल्याने ही दुर्दैवी घटना घडली. मात्र या भिंतीचे काम हे चार टप्प्यात होणार होत. पहिल्या टप्प्याच काम पूर्ण झाल्यावर दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या टप्प्याच्या कामाकडे दुर्लक्ष केलं गेलं असल्याचा आरोपही दानवे यांनी केला.

सध्या पुरामुळे पहिल्या टप्प्याच काम नव्याने करावं लागेल अशी स्थिती आहे. या संरक्षक भिंतीचे चारही टप्प्यांच्या कामाचा नव्याने डीपीआर बनवून काम लवकरात लवकर हाती घ्यावे, या कामात आमचं सहकार्य राहील अशा सूचना जिल्हाधिकारी यांना केल्याचे दानवे म्हणाले.

प्रशासन यंत्रणेवर नसलेलं नियंत्रण, अतिविश्वास व विकासाच्या गप्पा मारणाऱ्यांमुळे नागपूरकरांना पुराला सामोरे जावं लागत असेल तर हे दुर्दैव असल्याची टीका दानवे यांनी केली. यावेळी संपर्क प्रमुख व आमदार दुष्यंत चतुर्वेदी, माजी खासदार प्रकाश जाधव, सुरेखा खोब्रागडे जिल्हा संघटिका, शिल्पा बोडखे पूर्व विदर्भ महिला संघटिका, माजी जिल्हा प्रमुख सतीश हरडे व पदाधिकारी उपस्थित होते.

# अभिषेक बॅनर्जी यांची मालमत्ता केवळ ३ विमा पॉलिसी

■ कोलकाता

**तृणमूल** काँग्रेसचे नेते आणि खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्याकडे जीवन विमा महामंडळाच्या (एलआयसी) तीन विमा पॉलिसींशिवाय कोणतीही मालमत्ता नाही, यावर कोलकाता उच्च न्यायालयाने सोमवारी आश्चर्य व्यक्त केले. न्यायाधीश न्यायमूर्ती अमृता सिन्हा यांनी शाळा भरती घोटाळा प्रकरणात, बॅनर्जी यांच्या घोटाळ्यातील सहभागाबाबत योग्य प्रकारे चौकशी न केल्याबद्दल ईडीच्या कामगिरीवर ताशेरे ओढले.

खंडपीठाने यापूर्वीच्या सुनावणीत, बॅनर्जी यांच्या मालकीच्या कंपनीच्या विविध संचालकांच्या मालमत्तेची यादी सादर करण्याचे आदेश ईडीला दिले होते. न्यायमूर्तींनी म्हटले की, कागदपत्रांवरून असे दिसून आले आहे की त्यांच्याकडे (बॅनर्जी) फक्त तीन विमा पॉलिसी आहेत. ते खासदार आहेत. त्यांचे कोणतेही बँक खाते नाही? फक्त तीन विमा पॉलिसी आहेत. त्याचे बँक खाते असले पाहिजे जिथे त्याचा पगार जमा होतो. त्यामुळे तुम्ही (ईडीला) काही माहिती लपवत आहात की नाही हे मला समजू शकले नाही. खंडपीठाने लीप्स अँड बाउंड्स विरुद्धच्या तपासात तपास यंत्रणेच्या अनेक त्रुटींवरही प्रकाश टाकला.

# खासगी बस अपघातात २५ प्रवासी जखमी

■ जालना

**नागपूर-पुणे** महामार्गावर खासगी बस पुलावरून कोसळल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात बसमधील २५ प्रवासी जखमी झाले. यात चार प्रवाशांची प्रकृती गंभीर आहे. ही घटना नागपूर-पुणे महामार्गावर बदनापूर तालुक्यातील मात्रेवाडी शिवारात सोमवारी मध्यरात्री १ वाजताच्या सुमारास घडली. या अपघातातील जखमींवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती बदनापूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक सुदाम भागवत यांनी दिली. ही बस पुण्यावरून नागपूरच्या दिशेने जात होती. यावेळी बसच्या चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने बस मात्रेवाडी परिसरातील पुलावरून खाली कोसळली.

# संभाजीनगर, धाराशीव नामांतर याचिकेवर शुक्रवारी सुनावणी

■ मुंबई

**औरंगाबाद** जिल्ह्याचे छत्रपती संभाजीनगर व उस्मानाबाद जिल्ह्याचे धाराशीव नामांतर करण्याच्या सरकारच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. या याचिकांवर २९ सप्टेंबर रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ एस डॉक्टर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी होणार आहे. या दोन्ही शहरांच्या नामांतराला यापूर्वीही याचिकांद्वारे आव्हान देण्यात आले असून त्यावरील सुनावणी प्रलंबित आहेत. नामांतराच्या विरोधात याचिकाकर्त्यांनी याचिका दाखल केली होती.


निविदा सूचना

वाडा नगरपंचायत, जि. पालघर

मुख्याधिकारी वाडा नगरपंचायत यांचे तर्फे "वाडा नगरपंचायत हद्दीत स्वच्छ महाराष्ट्र २.० अंतर्गत Legacy waste dumpsite Redumption चे काम करणे" या कामासाठी दि. २८/०९/२०२३ ते दि. ०९/०६/२०२३ रोजी पर्यंत www.mahaetenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा मागविण्यात येत आहे. तरी भरणाऱ्या इच्छुकांकडून ई-निविदा पद्धतीने दि. ०९/१०/२०२३ पर्यंत भरण्यात यावी.

जा. क्र. २५८१/२०२३ दि. २६/०९/२०२३

सही/-
प्रशासक तथा मुख्याधिकारी
वाडा नगरपंचायत, वाडा


# एनजीओंच्या परदेशी निधीवर आता सरकारची करडी नजर

■ नवी दिल्ली

**केंद्र** सरकार आता देशातील एनजीओंना म्हणजेच अशासकीय संस्थांना परदेशातून मिळणाऱ्या निधीवर करडी नजर ठेवणार आहे. त्यासाठी केंद्रीय गृह मंत्रालयाने एफसीआरए अर्थात 'फॉरेन कॉंट्रीब्युशन रेग्युलेशन ॲक्ट' अंतर्गत नोंदणीकृत अशासकीय संस्थांमार्फत वार्षिक रिटर्न भरण्याशी संबंधित नियमांमध्ये बदल केले आहेत. नवीन नियमांनुसार आता एफसीआरए अंतर्गत नोंदणीकृत एनजीओंना परदेशी निधीचा वापर करून उभारलेल्या जंगम आणि स्थावर मालमत्तेचा तपशील द्यावा लागणार आहे. गृह मंत्रालयाने काल सोमवारी एक अधिसूचना जारी करून ही माहिती दिली.

यासंदर्भात अधिसूचना जारी केल्यानंतर अशासकीय संस्थांना प्रत्येक आर्थिक वर्षाच्या अखेरीस ३१ मार्च रोजी संपत्ती जाहीर करणे बंधनकारक झाले आहे. कायद्यानुसार विदेशी निधी मिळवणाऱ्या सर्व एनजीओंना आता एफसीआरए अंतर्गत नोंदणी करावी लागेल. गृह मंत्रालयाने परदेशी योगदान नियमन नियम, २०१० च्या फॉर्म एफसी-४ मध्ये दोन विभाग जोडून बदल केले आहेत. या सुधारणांमध्ये (बीए) विदेशी निधी वापरून तयार केलेल्या जंगम मालमत्तेचे तपशील (आर्थिक वर्षात ३१ मार्च रोजी) आणि (बीबी) विदेशी निधी वापरून तयार केलेल्या स्थावर मालमत्तेचे तपशील (आर्थिक वर्षात ३१ मार्च रोजी) समाविष्ट आहेत. फॉर्म एफसी- ४ सर्व एनजीओ आणि संघटनांद्वारे दाखल केला जातो ज्यांना त्यांचे वार्षिक खाते फाइल करण्यासाठी एफसीआरए परवाना देण्यात आला आहे.


MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

TENDER NOTICE

Tenders are invited for procurement of LT XLPE AL. Arm. Cable of size 3.5 C X 120 sq.mm & 3.5 C X 70 sq.mm under RDSS Cyclone Resilient Network for NCRMP works of Ratnagiri & Sindhudurg District with Estimated Cost of Rs. 140.47 Crs. against MSEDCL advertised Tender on website vide no. MMD/T-LTM-18/0923 due for submission on dtd. 10/10/2023.For details please visit website: https://etender.mahadiscom.in/eatApp/

HO PR 365/2023 Chief Engineer [MMD]



MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

E-TENDER NOTICE

Chandrapur Super Thermal Power Station MAHAGENCO, invites Proposals from reputed and experienced Companies to Participate in the Competitive bidding Process to following Tenders.

| S.N. | Tender NO (Rfx No) / Descricption / Estimated Cost in Rs. |
|---|---|
| 1 | 3000042093/Annual contract for cleaning work including lifting/shifting of spilled over coal and allied activities in Zone-B in CHP-ACSTPS for two years/Rs.59534733.90 |

Above floated tender published in MAHAGENCO online Portal. For the detailed Tender document, interested bidders should visit SRM Website https://eprocurement.mahagenco.in for (Sr. No. 01)

For any query Contact No.8554991818.

Sd/-
CHIEF ENGINEER (O&M)
CSTPS, CHANDRAPUR


# जादा गाड्यांच्या फेऱ्यांमुळेच कोकण रेल्वे वेळापत्रक ठप्प

■ मडगाव

गणेशोत्सवासाठी कोकण रेल्वे मार्गावर विशेष गाड्या सोडण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला. मात्र या जादा गाड्यांच्या फेऱ्यांमुळेच कोकण रेल्वेचे वेळापत्रक ठप्प होण्याची वेळ आली आहे. या जादा गाड्या दोन ते तीन तास उशीरा स्थानकांवर येत असल्याने याचा प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.


कॅन्ट्रोनिक्स ऑफीस इक्विपमेंट प्रायव्हेट लिमिटेड
सीआयएन: U32109MH1994PTC084138
परिसमापक: भारती मनोज ढागा
(नोंद. क्र. IBBI/IPA-01/IP-P01963/20-21/13070)

शुद्धीपत्रक

कॅन्ट्रोनिक्स ऑफीस इक्विपमेंट प्रायव्हेट लिमिटेडच्या परिसमापकाद्वारे फ्रीप्रेस जर्नल (इंग्रजी - मुंबई आवृत्ती) आणि नवाकाळ (मराठी - मुंबई) या वृत्तपत्रांमध्ये दि. २६ सप्टेंबर, २०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या ई-लिलाव सूचनेच्या संदर्भात. याद्वारे सूचित करण्यात येते की, लिलावाचा दिनांक ४ ऑक्टोबर, २०२३ आहे. इतर सर्व वेळापत्रकामध्ये कोणताही बदल नाही.

सही/-
भारती मनोज ढागा
परिसमापक: कॅन्ट्रोनिक्स ऑफीस इक्विपमेंट प्रायव्हेट लिमिटेड
(नोंद क्र. IBBI/IPA-01/IP-P01963/20-21/13070)
पत्ता: १४बी पलश टॉवर, वीरा देसाई रोड, अंधेरी (प), मुंबई ४०००५३.
ईमेल: liquidcantronics@gmail.com



PANVEL MUNICIPAL CORPORATION, PANVEL

NOTICE INVITING E-TENDER

Online Tenders (e-tender) for the following work are invited by The Municipal Commissioner Panvel Municipal Corporation Panvel from well qualified & experienced Agencies for supply and Installation and maintenance of GPS vehicle on web portal http://mahatenders.gov.in

Online Tender is invited for the following work up to 23/10/2023 at 15.00 PM

The details can be viewed and downloaded online directly from the Web Portal http://mahatenders.gov.in from 27/09/2023 at 15.00 PM onwards

| Sr. No. | Name of the Work | Time Limit for Completion (Years) | Earnest Money Deposit | Cost of Blank Tender Form |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | Supply installation and maintenance of GPS vehicle tracking systems for 5 years for PMC vehicles | 05Years from the date of issue of work order | Rs.1.82 lakh | Rs.1,000/-+ 18% GST = 1,180/- (non-refundable) |

1. All eligible/ interested tenderers are mandated to get Digital Signature fore-tendering
2. All the tenderers have to pay the tender fees and EMD /Bid Security through online payment Gateway only Failing which the tender will be disqualified.
3. Tender form submitted through post/ couner shall not be accepted
4. Rignt for any amendment in the Terms & Condition of Tender and the right to reject courier any or all offers without assigning any reason thereof is reserved with Municipal Commissioner.

SD/-
Additional Commissioner,
Panvel Municipal Corporation

जा.क्र. पमपा/घकवि/२५२३/प्र.क्र.२६०/८६५/२०२३



महावितरण

ई-निविदा सूचना

महावितरणतर्फे पाच वर्षांसाठी SAP ECC चे RISE आधारित S/4 HANA मध्ये अपग्रेड करण्यासाठी सिस्टिम इंटिग्रेटर (ERPSI) च्या निवडीकरिता आणि SAP TRM आणि कॅश मॅनेजमेण्ट मोड्यूलचे इंस्टॉलेशन, कमिशनिंग आणि इम्प्लिमेंटेशन करिता आणि सर्व कोअर आणि कस्टम मोड्यूल चे दोन वर्षांसाठी अप्लिकेशन मेन्टेनन्स साठी पात्र निविदाकारांकडून निविदा मागविण्यात येत आहे. दि. ०५.१०.२०२३ रोजी १५:०० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे प्री बिड मीटिंग आयोजित केली जाईल (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग लिंक: https://meet.google.com/ttp-mcqa-emk). निविदा सादर करण्याची शेवटची तारीख २०-१०-२०२३, १७.०० वाजेपर्यंत आहे. संपूर्ण निविदा दस्तऐवज महावितरण ई-टेंडरिंग वेबसाइट https://etender.mahadiscom.in वर उपलब्ध आहे.

निविदा क्र. CGM-IT/RDSS/SAP AMS/23-24/017
निविदा शुल्क : ₹ २९,५००/-
इसारा रक्कम : ₹ १ कोटी १७ लाख/-
HOPR: ३६५/२०२३ दिनांक २६.०९.२०२३

मुख्य महाव्यवस्थापक (मा.तं),
महावितरण, प्रकाशगड, ४था माळा
प्रा. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे पूर्व मुंबई-५१
ई-मेल: sapams@mahadiscom.in